Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधीची महत्वाची अप्रकाशित ऐतिहासिक साधने

**किमया किशोर देशपांडे**

आय.टी. क्षेत्रात कार्यरत, निवेदिका, अनुवादिका, इंडोलॉजिस्ट

kimayakishor90@gmail.com

**सारांश:**

इतिहास म्हणजे 'इति + ह् + आस' म्हणजे 'असे झाले'. 'याप्रमाणे घडले'. ह्यात सर्व घडलेल्या गोष्टी येतात आणि अर्थात त्या घडल्या तशाच सांगितल्या गेल्या असे मानले जाते. परंतु काही अज्ञान, काही पूर्वग्रह व काही प्रमाणात भूतकाळातील विचार व भावना समजण्याची माणसाची असमर्थता यांमुळे इतिहासलेखन हे खरोखरी अगदी जसे घडले तसेच्या तसे सांगितले, अशा स्वरूपाचे होणे शक्य नाही. तथापि आदर्श स्वरूपात इतिहास म्हणजे जे घडले ते जसेच्या तसे सांगणे व तेवढेचसर्व सांगणे, असाच अर्थ केला जातो. महाराष्ट्र हे भारतातील राज्यांपैकी पश्चिम भागातले एक विकसनशील राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा, दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे. अनेक इतिहास संशोधक, विचारवंत, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार यांनी महाराष्ट्राचा इतिहास अभ्यासपूर्वक सांगितला आहे. पण इतिहासाचे सतत संशोधन चालू असणे काळाची गरज आहे.

आज महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करताना विद्यार्थी, संशोधक प्रस्थापित आणि सुसज्ज अश्या ग्रंथालयाचा आधार घेतात. ग्रंथ आणि पुस्तके इतक्या मर्यादित साधनांचा वापर करतात. पण याव्यतिरिक्तही महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी असे साहित्य विखुरलेले आहे की ज्यामध्ये ग्रंथसाहित्य, हस्तलिखित, ताडपत्रे, ताम्रपट, शिलालेख आहेत. ती केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सीमेवर, कर्नाटकात आणि तेलंगणामध्येसुद्धा महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित हजारोंनी पसरलेली आहेत. याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मी या संशोधन लेखामध्ये करीत आहे. उदाहरणार्थ,दत्त संप्रदायाचा मठ, कोलंबी, तालुका नायगाव, जिल्हा नांदेड तसेच गोसावी मठ, बेटमोगरा अशी २७ स्थळे सांगता येतील. त्याचा अभ्यास करून हस्तलिखिते, शिलालेख आणि ताम्रपट यांच्या आधारे महाराष्ट्राचा अजून काही नवा किंवा कदाचित वेगळा इतिहास बांधता येईल. आजपर्यंत उजेडात न आलेली हस्तलिखिते, दस्तऐवज, शिलालेख किंवा ताम्रपट आहेत ज्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. नव्या तरुण अभ्यासकांनी आणि संशोधकांनी ह्या बाबींचा जरूर मागोवा घ्यावा.

**किवर्डस:**इतिहास, महाराष्ट्र, खजिना, अप्रकाशित, साधने, नांदेड, मराठवाडा, शिलालेख, चालुक्यकालीन, बेटमोगरा

## इतिहास म्हणजे काय?

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची नोंद व ज्ञान होय. 'असे झाले' , 'याप्रमाणे घडले'. अनेक देशीपरदेशी इतिहासकारांनी इतिहासाची व्याख्या वेगवेगळी केली असली तरी इतिहास म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटना, त्याबाबतची माहिती.

कोणत्याही देशाच्या इतिहासलेखनास प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने उपयोगी पडणाऱ्या साधनांना इतिहाससाधने म्हणतात. या साधनांचे वर्गीकरण निरनिराळ्या प्रकारांनी होते. इतिहासकाळाचे प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन असे तीन विभाग मानून त्यांत समाविष्ट होणाऱ्या साधनांचा विचार करता येतो. साधनांचे लिखित व अलिखित साधने असेही एक वर्गीकरण करता येते. लिखित साधनांत निरनिराळ्या भाषांमधील ग्रंथ, शकावल्या, करीने, वंशावळी, बखरी, तवारिखा, कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख, नामे - करारनामे, तहनामे इत्यादींचा समावेश होतो. अलिखित साधनांत पुरातत्त्वीय वस्तू, भांडी, आयुधे, चित्रे, शिल्पे, वास्तू व स्मारके यांचा समावेश होतो. प्रत्येक देशाला आपल्या इतिहासलेखनासाठी इतिहास साधनांचा उपयोग होतो.

**महाराष्ट्र राज्य आणि त्याचा इतिहास:**

महाराष्ट्र हे भारतातील राज्यांपैकी पश्चिम भागातील एक विकसनशील राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा, दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे. अनेक इतिहास संशोधक, विचारवंत, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार यांनी महाराष्ट्राचा इतिहास अभ्यासपूर्वक सांगितला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत पूर्वसुरींबद्दल आढावा घ्यायचा तर त्यांची माहिती आणि कार्य अफाट आहे. वेदकाळापासून श्रुतिस्मृतिपुराणे व ताम्रशिलाशासने यांचा अभ्यास करून महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास लिहिणारे अनेक इतिहासकार होऊन गेले. जुन्या कागदपत्रांचा त्यांना ध्यास होता. कागदपत्रे नाहीत तर इतिहासलेखन शक्य नाही. अशा आशयाचे उद्‌गार हे इतिहासकार काढत असत.

इतिहासाचे सतत संशोधन चालू असणे काळाची गरज आहे.

**इतिहासाचे संशोधन - सद्य परिस्थिती**

इतिहास जागतिक संस्कृतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. सध्याच्या इतिहास संशोधनाची परिस्थिती पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की, राजकीय इतिहासाच्या बरोबरीने आर्थिक, सामाजिक, धार्मिक, साहित्यिक अथवा वाङ्मयीन इतिहास यांचा अभ्यास वाढत चालला आहे. चित्रपटसृष्टीचा इतिहास, वाहतूक संकल्पनेचा इतिहास, शास्त्रांचा इतिहास, मंदिरांचा इतिहास, गावांचा इतिहास, आडनावांचा इतिहास, वाङ्मयाचा इतिहास यातून इतिहासाचे क्षेत्र अधिक विस्तारत चालले आहे. त्यामुळे इतिहास अभ्यासकांस विस्तृत क्षेत्र उपलब्ध होत चालले आहे. इतिहासाचा अभ्यास, मांडणी, लेखन तसेच इतिहास विषयाला वाहिलेल्या वाहिन्या यामुळे इतिहासाविषयीचे आकर्षण वाढतच चालले आहे. पण आज एक गोष्ट खटकते आहे की आज महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करताना विद्यार्थी, संशोधक प्रस्थापित आणि सुसज्ज अश्या ग्रंथालयाचा आधार घेतात. ग्रंथ आणि पुस्तके इतक्या मर्यादित साधनांचा वापर करतात. मान्य आहे की, संगणक, इंटरनेट, मोबाइल, फोटोग्राफी, दूरदर्शन, टेपरेकॉर्डर, अनुवाद साधने यामुळे इतिहास संशोधनाचे क्षितीज विस्तारले आहे.

म्हणूनच इथे एक मुद्दा आवर्जून मांडावासा वाटतो आहे की, इंटरनेटवर किंवा इ- माध्यमाद्वारे उपलब्ध न झालेली, किंवा ग्रंथ वापुस्तकरूपात न आलेली अशी कितीतरी माहिती जुन्या कागदपत्रांमधून उपलब्ध आहे. हेच विधान मी एक संशोधनाचा विषय म्हणून मांडू इच्छिते की अशी कितीतरी जुनी कागदपत्रे उपलब्ध आहेत की जी शोधून वाचून अभ्यासणे महत्वाचे आहे. ज्याने इतिहासात भर पडेल किंवा कदाचित सर्वांना माहित असलेल्या इतिहासात काही बदलसुद्धा घडू शकेल.

**इतिहासाच्या साधनांचा खजिना आहे? हो ! भांडार आहे!**

महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी असे साहित्य विखुरलेले आहे कीज्यामध्ये, ग्रंथसाहित्य, हस्तलिखित, ताडपत्रे, ताम्रपट, शिलालेख आहेत. ती केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सीमेवर, कर्नाटकात आणि तेलंगणामध्येसुद्धा महाराष्ट्राच्या

इतिहासाशी संबंधित हजारोंनी पसरलेली आहेत. याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मी या संशोधन लेखामध्ये करीत आहे. एकूण अशी २७ स्थळे सांगता येतील की त्यांचा अभ्यास करून हस्तलिखिते, शिलालेख आणि ताम्रपट यांच्याआधारे महाराष्ट्राचा अजून काही नवा किंवा कदाचित वेगळा इतिहास बांधता येईल. आज पर्यंत उजेडात न आलेली हस्तलिखिते, दस्तऐवज, शिलालेख किंवा ताम्रपट आहेत ज्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**कुठे दडला आहे तो खजिना? खुलं जा सिमसिम**

१)गोदातीर इतिहास संशोधन मंडळ नांदेडमध्ये आहे तिथे आजही संशोधक जात नाहीत. चाळीस वर्षांपासून ते बंद होते. त्याच्या चाव्या कुठे आहेत हे सुद्धा कोणाला काही माहिती नव्हते. दिग्गज इतिहास संशोधकांनासुद्धा काहीही माहिती नव्हती. मग कुलूप तोडून सर आणित्यांचे सहकारीआतमध्ये शिरले. तिथे कागदपत्रे प्रचंड धुळीत पडली होती. ती सगळी बाहेर काढली, बघितली. तोपर्यंत कोणीही ते बाड उघडलेच नव्हते. तात्यासाहेब कानोले यांचे महत्वपूर्ण लेख यात आहेत.ठिकाणी आहे ते आंबेगाव?आंबेनगरी असे उल्लेख सापडतात. दासोपंतांच्या पासोडीसारखे संशोधनात्मक लेख त्यात आहेत. श्री. तात्यासाहेब कानोले या तज्ज्ञ इतिहासकारांनी जमा केलेली हस्तलिखिते इथे उपलब्ध आहेत पण त्यांनी केलेल्या कामाचा, गोळा केलेल्या कागदपत्रांचा कोणीही अभ्यास केलेला नाही.

२) भारतीय मूलभूत इतिहास संशोधन मंडळ, जिल्हा नांदेड येथे श्री. समुद्रगुप्त पाटील यांनी स्थापन केले आहे त्याच्या संग्रही खूप सारी हस्तलिखिते, ताम्रपट, नाणी आहेत पण ती सगळी अप्रकाशित आहेत.

३) दत्त संप्रदायी मठ, कोलंबी, तालुका नायगाव जिल्हा नांदेड येथील मठात यज्ञधुनी आहे. यज्ञधुनीच्या खाली एकातळघरामध्ये ४०- ४५ वर्षांपूर्वी गाडलेली, पेटाऱ्यात बंद करूनठेवलेली हस्तलिखिते सापडली आहेत ज्याच्यामध्ये मानभावाचे मुत्साव म्हणजे महानुभाव संप्रदायाच्या संदर्भात आणि देवगिरीच्या यादव यांच्या संदर्भातील महत्वपूर्ण माहिती देणारे इ.स. १३५५ मधील हस्तलिखित मिळाले आहे. ८ व्या शतकात हाशाक्त संप्रदायाचा मठ होता याबाबत माहिती देणारे शाबरीतंत्र विद्येसारखी त्याच्यामध्ये हस्तलिखिते मिळाली. या मठामधून काला जादू ज्याला आपण म्हणतो या संदर्भातील खूप सारी माहिती ही पश्चिम बंगालमध्ये गेली. आज काला जादूसाठी पश्चिम बंगाल मुख्य अगदी माहेरघर मानले जाते. पण मुळात इथून गेलेली कागदपत्रे तिथे उपलब्ध आहेत. हे सगळे पण का गाडले गेले होते? तर तेथील ति. तुलसीवन महाराज गेल्यानंतर त्यातील भाषा आणि लिपी कोणाला वाचता येत नव्हती व समजत नव्हती. ती कागदपत्रे देवनागरी, मोडी, संस्कृत आणि हळकन्नड (म्हणजे ओल्ड कन्नड आणि तेलगू असे मिश्रीत) या भाषांमधून होती. ही हस्तलिखिते काढायला कोणीही तयार नव्हते कारण स्थानिक लोकांचे असे म्हणणे होते कि जो कोणी याला हात लावेल त्याचा वंश नष्ट होईल. पण श्री भुजंगराव बोबडे यांनी आयुष विभागाच्या सहकाऱ्यांसोबत धाडसाने इतिहासाच्या प्रेमापोटी, अभ्यास आणि संशोधन यासाठी ती कागदपत्रे उघडली कारण त्यांच्यामते, ती साधने संशोधकांपर्यंत पोहोचणे महत्वाचे होते. असा हा एक कोलंबी, नायगाव, नांदेड येथील महत्वाचा मठ.

४)गोसावी मठ – बेटमोगरा: येथे खूप सारे औरंगजेबाने दिलेले ताम्रपट आहेत. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मठावरती चंद्र दिसतो याचे कारण म्हणजे औरंगजेब बादशाहाने या मठाला इनाम दिलेले होते. आजही येथे मठ चालू आहे आणि तो हिंदू गोसावी चालवतात. गोसावी संप्रदायाचा हा मठ आहे. येथे असलेली हस्तलिखिते, ताम्रपट अजूनही अप्रकाशित आहेत. त्यापैकी फक्त दोन-तीन ताम्रपट इतिहासाच्या प्राध्यापिका डॉक्टर सुचिता किडीले, पंडित दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, लातूर यांनी २-३ प्रकाशित केले आहेत.पण बाकी अजून बरेच अप्रकाशित ताम्रपट आहेत. तिथे दोन शिलालेख अप्रकाशित मिळाले आहेत. त्यावर बेटमोगरा गावाचा उल्लेख केला आहे. बेटमोगरा तालुक्यातील रातोळी नावाचे एक गाव आहे. तिथे बारववर जे शीलालेख मिळाले ते अजून अप्रकाशित आहेत. त्यातील एक १७-१८ व्या शतकातील तर एक १९ व्या शतकातील आहे. एक देवनागरीतील आहे तर एक उर्दू फारसी भाषेमधील आहे. औरंगजेबाची प्रेयसी हिराबाई बेगम म्हणजे जैनाबादी तिथून चालली होती. तिला प्रवासात पाणी लागू शकते म्हणून मग तिथे तळे केले जायचे. त्या संदर्भामधील हा शिलालेख आहे.कल्याणीचालुक्यांपासून ते औरंगजेबापर्यंतचा इतिहास यासाठीची ती इतिहासाची साधने आहेत.

५) वालचंद महाविद्यालय ग्रंथालय,सोलापूर: येथे अनेक अप्रकाशित हस्तलिखिते, ग्रंथ आहेत. त्यामध्ये कांचीकामेठीमधील शंकराचार्य यांची संपूर्ण वंशावळ आपल्याला मिळते. सोलापूरच्या वालचंद कॉलेजमध्ये ही हस्तलिखिते कुठून आली? हा सुद्धा एक संशोधनाचाच विषय आहे.

६) हिराचंद नेमचंद ग्रंथालय, जिल्हा सोलापूर येथे खूप हस्तलिखिते आहेत.

७) महावीर शास्त्री, जिल्हा सोलापूर यांचेकडे बरीच हस्तलिखिते आहेत. सोलापूरमधील एका मठावर डॉक्टर आनंद कुंभार सरांनी काम केले आहे पण कदाचिततिथेसुद्धा अजून काही कागदपत्रे अभ्यासाची मिळतील किंवा राहिली असतील अशीही एक शक्यता आहे.

८) जैन मठ, दहिगाव, जिल्हा सातारा: शिखर शिंगणापूरच्याजवळ एक छोटंसं खेडेगाव आहे. या जैन मठामध्ये जवळपास२००० हस्तलिखिते, ८५ मूर्ती, लेख आणि सुमारे ३० ताम्रपट आहेत. जैन संप्रदायाचा हा खाजगी ट्रस्ट आहे तिथे अजून कोणीही गेलेले नाही. इथे महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधी खूप पुरावे सापडतील पण योग्य प्रयत्न आणि त्यादृष्टीने काम होणे गरजेचे आहे. येथील मूर्ती तळघरात आहेत. आत गेले कि डाव्या बाजूला एक खूप मोठे दालन आहे जिथे त्यांना संग्रहालय करायचे होते पण दुर्दैवाने कोणी पुढे आले नाही आणि तिथे आज ताम्रपट धूळ खात पडले आहेत. तसेच जी हस्तलिखिते आहेत ती मुख्य मूर्तीच्या उजव्या बाजूला काचेच्या बंद कपाटात आहेत. अगदी व्यवस्थित नीट यादी तयार करून ठेवली आहेत. पण त्याचा अभ्यास झालेला नाही किंवा ती प्रकाशित काही झालेले नाहीत.

९)मराठवाडा संशोधन मंडळ एस. जी. जोशी, जिल्हा लातूर, यांच्याकडे बरीच हस्तलिखिते आहेत. १९७४-७५ मध्ये त्यांनी त्या हस्तलिखितांची सूची तयार केली आहे.

१०)शिवलिंग शिवाचार्य मठ, अहमदपूर, जिल्हा लातूर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्याकडे अश्या प्रकारची खूप साधने आहेत.

११)शांतीतीर्थ स्वामी, रेणापूर, हे आता औरंगाबाद येथे स्थायिक झाले आहेत. मराठवाडा संदर्भातील इतिहासाची माहिती देणारी बरीच हस्तलिखिते त्यांच्याकडे आहेत ज्यामध्ये औसाचे पाठक नावाचे गृहस्थ होते त्यांनी खूप सारी हस्तलिखिते लिहिली आहेत. त्याचप्रमाणे महाकवी मल्लिनाथ सूरी यांच्या संबंधीची काही हस्तलिखिते त्यांच्या संग्रहालयामध्ये आहेत.

१२) वेदशास्त्रोत्तेजक मंडळ, सगरोळी, जिल्हा नांदेड येथे देशपांडे या सद्‌गृहस्थांनी खूप हस्तलिखिते जमा केली आहेत.

१३) शुकदास मठ, हदगाव, जिल्हा नांदेड: या मठात सुद्धा बरीच हस्तलिखिते आहेत. १९६९ ला हैदराबाद येथे राहणाऱ्या एका सद्‌गृहस्थांनी पी.एच.डी. केली होती त्यांच्या शोधनिबंधांमध्ये या शुकदास संत मठाचा उल्लेख आहे. मराठी साहित्य परिषदेच्या ग्रंथालयांमध्ये आजही तो प्रबंध आहे. नांदेड जिल्हा येथील अनेक गोष्टींची माहिती यात मिळते.

१४) महानुभाव संप्रदाय मठ, लिंबगाव, जिल्हा नांदेड: येथे हस्तलिखिते आहेत.

१५)धर्माधिकारी संग्रहालय, बरबडा तालुका नायगाव, जिल्हा नांदेड: येथे हस्तलिखिते आहेत.

१६)शास्त्रीबुवा बिल्लाळीकर, बिल्लाळी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड: येथे हस्तलिखिते आहेत.

१७) देशमुख संग्रहालय, बऱ्हाळी, तालुका मुखेड जिल्हा नांदेड: देशमुखांनी केलेले संकलन आणि संग्रह आहे. जिथे स्वतः श्री. दत्तो वामन पोतदार सर जाऊन आले आहेत. मराठ्यांच्या इतिहासाबाबतची सर्वाधिक कागदपत्रे विशेषतः उदगीरच्या लढाई संदर्भातील ही देशमुखांच्या संग्रहालयामध्ये आहेत. साधारणतः ५००० एवढा दस्तऐवज आहे. श्री. वि. का. राजवाडे यांनी १९३९ ला "गव्हर्नमेंट ओरिएंटलला उदगीरची लढाई नावाचे एक पुस्तक प्रकशित केले. त्यात त्यांनी यापैकी ७०-८० दस्तऐवज वापरले असतील पण या बऱ्हाळीकर देशमुखांकडे हजारोंनी दस्तऐवज आहे. ती बाड आजही तशीच अत्यंत दुरावस्थेत पडून आहेत. जी त्यांनी कोणालाही दाखवलेली नाहीत. कोणी तरी पुढाकाराने तिथे जाऊन ती उघडून त्याच्यावर काम व्हायला पाहिजे. नांदेडमधील एखाद्या कॉलेजनी किंवा महाराष्ट्र पुरातत्व विभागाच्या मदतीने हे कागदपत्रे अभ्यासण्याचे

काम झाले पाहिजे. मराठ्यांच्या इतिहासातील सगळ्यात मोठा विजय म्हणजे उदगीरची लढाई. पहिले बाजीराव पेशवे आणि मस्तानी यांचा मुलगा समशेर बहादुर त्यांनी मोठा पराक्रम गाजवला होता अश्या संदर्भातील कागदपत्रे तिथे आहेत.

१८) रामकृष्ण महाराज मठ, कुंडलवाडी तालुका जिल्हा नांदेड: येथे हस्तलिखिते आहेत.

१९) धुंडा महाराज देगलूरकर मठ, देगलूर, जिल्हा नांदेड: येथे हस्तलिखिते आहेत.

२०) रामदासी मठ, नळदुर्ग, जिल्हा उस्मानाबाद: येथे हस्तलिखिते आहेत.

२१) कल्याण स्वामी मठ– डोमगाव, तालुका परांडा, जिल्हा उस्मानाबाद: येथे हस्तलिखिते आहेत.

२२) देशमुख कुटुंब संग्रहालय-लोहारा आणि करडखेल तालुका उदगीर, जिल्हा लातूर: त्यांनी खूप वाळवी लागलेली कागदपत्रे गोळा करून वाचायचा प्रयत्न केला. तर, निजामानी जी पहिली रेल्वे सुरु केली. त्या काळातील हैदराबाद काचीगुडा ते मनमाड एक्सप्रेस ही लाइन टाकण्यासाठी १६ रुपये मंजूर केले होते अश्या स्वरूपाची माहिती या दस्तऐवजातून समजली. पण ती सर्व कागदपत्रे नीट जपून, वाचून अभ्यासणे जरुरीचे आहे.

२३)सुधीरराव जोशी रामदासी मठ – निलंगा, जिल्हा लातूर: निलंग्यातील निळकंठेश्वराचे प्रसिद्ध मंदिरातील आवारात आहे. तिथे बरीच हस्तलिखिते आहेत.

२४) गहिनीनाथ महाराज औसेकर मठ – औसा, जिल्हा लातूर: महाराजांकडे चक्री भजनाची परंपरा आहे त्यांच्याकडे खूपसारी हस्तलिखिते आहेत ज्यामध्ये,महाराष्ट्राची जी भजन-कीर्तन परंपरा आहे त्यासंबंधी खूप माहिती आहे.

२५) रंगा महाराज मठ – बसमत जिल्हा परभणी: येथे हस्तलिखिते आहेत.

२६) गणेश सार्वजनिक वाचनालय – जिल्हा परभणी(११५ वर्षे जुने)

२७) भुजंगराव बोबडे यांनी हजारो ऐतिहासिक दुर्मिळ साहित्य व दस्ताऐवजांचे संकलन केलेले आहे. तसेच हैदराबाद मराठी साहित्य परिषद स्थापन केलेल्या मंडळींनी अभ्यास करून संग्रही ठेवलेले पण हे अप्रकाशित साहित्य तेथे आहे. प्रसिद्ध साहित्यिक नांदापूरकर यांनी संकलित केलेली पण अप्रकाशित दस्तऐवज त्या ग्रंथालयामध्ये आहे. त्याच मंडळींनी संकलित केलेली बरीच कागदपत्रे हैदराबाद मराठी साहित्य परिषदेत फक्त सूची बनून तयार आहेत पण आजतागायत यावर काहीही प्रकाश पडलेला नाही. ती कोणीही काम करून प्रकाशित केलेली नाहीत.

**<u>अनुमान: आम्ही पवित्रा होऊ - आम्ही सज्ज होऊ !!</u>**

दुर्लक्षित गोष्टींकडे इतिहासाच्या दृष्टिकोनातून बघितले पाहिजे. प्रत्येक गावाचा, तालुक्याचा, जिल्ह्य़ाचा, हेरिटेज स्थळांचा इतिहास लिहायला हवा. कागदपत्रांची जपणूक, उत्तम दर्जाची संग्रहालये आणि त्यांची जोपासना या सगळ्या गोष्टींकडे लक्ष वेधण्याची गरज आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल खूप सारी ग्रंथसंपदा, दस्तऐवज उपलब्ध आहे पण महाराष्ट्राच्या या ठेव्यावर काहीही काम झालेले नाही. फारतर सूची तयार झाली असेल.

महाराष्ट्रातील २७ ठिकाणे आहेत जिथेसगळी अप्रकाशित साधने आहेत. त्याचप्रमाणे तेलंगणामध्ये १३ ठिकाणे, कर्नाटकात ११ ठिकाणे तर अन्य एक अशी एकूण ५१ ठिकाणे आहेत जिथे अप्रकाशित दस्तऐवज, हस्तलिखिते, ग्रंथसंपदा, शिलालेख, ताम्रपट आहेत ज्याचा अभ्यास, संशोधन होणे गरजेचे आहे. हे इतके मोठे आवाहनात्मक काम कोण कधी, कसे आणि केंव्हा करणार हा मोठा प्रश्न आहे.

इतिहासाचे जे विद्यार्थ्यांना प्रोजेक्टस दिले जातात तेंव्हा त्यांना त्यांच्या परिसरातील भागात हे काम करायला सांगितले तरी खूप प्रगती होईल. काही कोडी सुटतील किंवा पडतीलसुद्धा. इतिहासाला नवी दिशा मिळेल.

संशोधन कार्यपद्धतीत गरजेनुसार आवश्यकतो बदल करून जर विद्यार्थी, अभ्यासक आणि संशोधक यांनीया ठिकाणी जाऊन जर काम केले, स्थानिक लोक आणि पुरातत्व विभागाची मदत घेतली तर खूप मोठे मौलिक कार्य घडून महाराष्ट्राचा वेगळा नवीन इतिहास कदाचित पुढे येऊ शकेल.

इतिहासाच्या अभ्यासासाठी मूलभूत साधनांचा शोध आणि मग अभ्यास करून इतिहासाची गरजेनुसार मांडणी करणे योग्य आहे. या सगळ्या इतिहास परिषदांच्या स्थापनेचा मूळ उद्देश तोच होता.

आज महाराष्ट्रामध्ये वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालये मिळून इतिहासाचे सुमारे ६५०० प्राध्यापक आहेत. जर या प्रत्येकाने वर्षाला एका जरी साधनाचा शोध घेऊन वापर करून अश्या पद्धतीने इतिहासाचे लिखाण केले तरी२५ वर्षे सरासरी नोकरीमध्ये दीड लाख साधने प्रकाशात येऊ शकतील.

नव्या तरुण अभ्यासकांनी आणि संशोधकांनी ह्या बाबीचा जरूर मागोवा घ्यावा.

**संदर्भ:**

1) मराठी विश्वकोश

2) पुराभिलेखविद्या, डॉ. शोभनालक्ष्मणगोखले

**तळटीप**: यासंशोधनाचामुख्यआधारम्हणजेइतिहासाचे अभ्यासक, दख्खन पुरातत्व व सांस्कृतिक संशोधन केंद्र हैदराबाद, संचालक भुजंगराव बोबडे सर यांच्याशी झालेली वैयक्तिकचर्चाहोय.

--- किमया किशोर देशपांडे



Photo 1: अप्रकाशित शिलालेख - रातोळी, नायगाव, नांदेड



Photo 2: अप्रकाशित चालुक्यकालीन शिलालेख - बेटमोगरा, मुखेड, नांदेड

Mahratta



अप्रकाशित चालुक्यकालीन शिलालेख - बेटमोगरा,मुखेड, नांदेड




**Photo 3:** तेलंगणा गावाच्या सीमारेषेवर महाराष्ट्रातील प्रसिद्ध राजघराणे यादव आणि रुद्रमादेवी काकतिय दरम्यान युद्धाच्या ट्रिनिटीबद्दल सर्वात महत्वाचे अप्रकाशित शिलालेख सापडले आहेत. भालकी जि. बिदर




**Photo 4:** श्री. भुजंगराव बोबडे यांनी हजारो ऐतिहासिक दुर्मिळ साहित्य व दस्ताऐवजांचे संकलन केलेले आहे.